# जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

**( सामान्य प्रशासन विभाग )**

**औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 (दुरध्वनी क्र. 0240-2329714)**

**ईमेल - gadzpaurangabad@gmail.com**

**संकेतस्थळ - https://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in**

**ई-मेल व्दारे**

सेवानिवृत्त होणाऱ्या जिल्हा परिषदेतील निवृत्तीवेतन विषयक लाभ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम 1982 नुसार विहित वेळेत मंजूर करणे बाबत.

**परिपत्रक**

जाक्र.जिपछंस/11-प्रशासन/साप्रवि/प्र.क्र.222/2026/2139
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद,छत्रपती संभाजीनगर.
दि. निम्म स्वाक्षरीत

पहा :- 1) वित्त विभागाचे परिपत्रक,वित्त क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.4/सेवा-7 दि.1 ऑगस्ट,2025.
2) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.संकीर्ण -2025/प्र.क्र.57/सेवा-4 दि.18 डिसेंबर,2025.
3) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण -2025/प्र.क्र.32/25/कोषा. प्रशा.5 दि.25 जुलै,2025.
4) प्रस्तूत कार्यालयाचे पत्र जाक्र.जिपछंस/11-प्रशासन/कावि/2025/231/2396 दि.5 ऑगस्ट,2025.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम,1982 मधील प्रकरण 10 मध्ये निवृत्तिवेतनाच्या आणि उपदानाच्या रक्कमांचे निर्धारण व प्राधिकृती व नियम 118 ते 125 मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विहित वेळेत सेवानिवृत्तिवेतन विषयक लाभ मिळण्यास्तव संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त होण्याच्या दिनांकापुर्वी 2 वर्ष अगोदर निवृत्तिवेतन विषयक प्रस्ताव तयार करण्याची पुर्व तयारी करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. तसेच संदर्भ क्र.1 वरील शासन परिपत्रकात सेवानिवृत्तिच्या अनुषंगाने सेवापुस्तक अद्ययावत करणे, वेतन निश्चितीची पडताळणी करणे, निवृत्तीवेतन प्रकरण तयार करणे, निवृत्तिवेतन मंजूर झाल्यानंतर करावयाची कार्यवाही, याबाबतचे टप्पे व जबाबदारी याबाबत तपशिलवार सूचना नमूद केल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.2 ते 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे व शासनाने वेळोवेळी याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. परंतू त्यानूसार कार्यवाही होतांना दिसून येत नाही. निवृत्तिवेतन धारकांना लाभ विलंबाने प्रदान झाल्याने त्यांना आर्थिक, मानसिक त्रास सहन करावा लागतो त्यामुळे तक्रारी, लोक आयूक्त/न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात. सद्यस्थितीत काही विभागांमध्ये जातवैधता अप्राप्त असणे, लाचलुचपत प्रकरणे प्रलंबीत असणे, प्रकरण न्यायप्रविष्ठ असणे या बाबीं व्यतिरिक्त इतर प्रकरणे जे की शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे व नियमानुसार निकाली काढता येऊ शकतात, अशी प्रकरणे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**परिपत्रक :-**

जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये प्रलंबीत असलेले सेवा निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन योग्यरित्या व विहित वेळेत निकाली काढण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

संवर्ग नियंत्रक विभाग प्रमुखांनी म.ना.से (निवृत्तिवेतन) नियम 1982 मध्ये नमूद केल्याप्रमाणे जे कर्मचारी येणाऱ्या दोन वर्षाच्या कालावधीत सेवानिवृत्त होणार आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या संवर्ग निहाय यादी अद्ययावत करावी. जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार असतील अशा कर्मचाऱ्यांच्या आहरण व संवितरण अधिकारी/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिनिस्त असलेल्या सहायक प्रशासन अधिकारी/कनिष्ठ प्रशासन अधिकारी व संबंधित आस्थापना कार्यासनाच्या लिपीका मार्फत संदर्भ क्र.1 वरील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "1" मध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार सेवानिवृत्त होणाऱ्या

**(कृ.मा.प.)**

कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांची सविस्तर तपासणी करावी. तपासणी अंती सेवानिवृत्ती प्रकरणांच्या अनुषंगाने वेतननिश्चिती प्रलंबीत असणे, नामनिर्देशनामध्ये नोंद अद्ययावत नसणे, गटविमा, रजा, सेवापडताळणी च्या नोंदी अपुर्ण असणे, संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबीत/प्रस्तावित असणे, सेवेमध्ये तांत्रिक खंड असणे, निलंबन कालावधी असल्यास त्याबाबतचा निर्णय प्रलंबीत असणे, जात वैधता प्राप्त नसणे, ई.अशा स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्यास, त्याबाबतची पुर्तता सर्वोच्च प्राधान्याने करावी. जेणे करुन सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त होण्यापुर्वीच त्यांचे सेवानिवृत्ति विषयक देय असलेले लाभ उदा. सेवाउपदान, अंशराशीकरण, भविष्य निर्वाहनिधीची अंतीम रक्कम, गट विमा मंजूर करण्यास अडचण उद्‌भवणार नाही व संबंधितास सेवानिवृत्त होतांनाच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सदरील लाभ मंजूर करण्यात येऊ शकतील, याबाबतची कार्यवाही करणे सुकर होईल.

सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी आपल्या स्तरावर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना व परिपत्रकातील सुचना विचारात घेऊन कालबध्द कार्यक्रम निश्चित करावा. प्रलंबीत असलेले सेवानिवृत्ती/कुटुंब निवृत्तिवेतन प्रकरण शीघ्रगतीने निकाली काढण्याबाबत दक्षता घ्यावी. विनाकारण निवृत्तिवेतन विषयक प्रकरण प्रलंबीत राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण वितरण अधिकारी/कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख यांची राहील असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

प्रकरणांच्या अकारण प्रलंबीततेमुळे व्याजाची रक्कम देणे,लोक आयुक्त प्रकरणास व न्यायालयीन बाबीस सामोरे जाणे, ई.प्रकरणे उद्‌भवल्यास त्याबाबत संबंधित कर्मचारी, आहरण व वितरण अधिकारी/कार्यालय प्रमुख, खाते प्रमुख यांची जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदरील परिपत्रक जिल्हा परिषदेच्या **https://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

सदरील परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

Digitally signed by
MINNU P M
Date: 06-07-2026
10:37:00

**मिन्नू.पी.एम. (भा.प्र.से)**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

**प्रतिलिपी :- माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. विभागीय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत :- आवश्यक कार्यवाहीस्तव.**

2. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,छत्रपती संभाजीनगर.
3. प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,छत्रपती संभाजीनगर.
4. विभाग प्रमुख -------------------- (सर्व) ,जिल्हा परिषद,छत्रपती संभाजीनगर.

5.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व यांना देऊन सूचीत करण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त असलेल्या तालुक्यातील सर्व आहरण वितरण अधिकारी/कार्यालय प्रमुख व सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

6.माहिती व तंत्रज्ञान कक्ष,प्रस्तूत कार्यालय प्रसिध्दीस्तव.

7.निवडनस्ती.